आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२९ जून २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- सर्वधर्मीयांच्या तीर्थक्षेत्रांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना लागू करण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानसभेत घोषणा

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णय विधीमंडळाचा हक्कभंग असल्याचा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा दावा

- अमरनाथ यात्रेला आजपासून सुरुवात, जम्मूतल्या भगवती नगर बेस कॅम्प इथून चार हजार २९ यात्रेकरूंची दुसरी तुकडी रवाना

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी साधणार संवाद

- भारत ठरला महिला कसोटी क्रिकेटमध्ये ६०० धावांचा टप्पा गाठणारा पहिला संघ

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जेतेपदासाठी आज भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम लढतीला सुरुवात, नाणेफेक जिंकून भारताचा प्रथम फलंदाजीचा निर्णय

**<><><><><>**

सर्वधर्मीयांच्या तीर्थक्षेत्रांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना लागू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिलं. तातडीनं अंमलबजावणी करण्यासाठी, लवकरच नियमावली तयार करून इच्छुकांकडून ऑनलाईन अर्ज मागवू, असं ते म्हणाले.  श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, यासह विशेष सहाय्याच्या योजनांचे पैसे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश देण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होऊ नये, यासाठी सरकार बांधिल आहे. यासंदर्भात विरोधी पक्षानं दिलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करेल , असं आश्वासन त्यांनी दिलं. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णय हा विधीमंडळाचा हक्कभंग असल्याचा दावा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केला. याप्रकरणी हक्कभंग दाखल करणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक लवकरात लवकर जाहीर करावी अशी मागणी आज विरोधकांनी विधानपरिषदेत केली.  या संदर्भात निर्णय घेण्यासाठी सरकारला थोडा वेळ द्यावा, सोमवारी गटनेत्यांच्या बैठकीत यावर चर्चा करता येईल असं उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

अमरनाथ यात्रेला आज सुरुवात झाली. अमरनाथ यात्रेसाठी जम्मूतल्या भगवती नगर बेस कॅम्प इथून आज पहाटे चार हजार २९ यात्रेकरूंची दुसरी तुकडी रवाना झाली. कडेकोट सुरक्षेसह यात्रेकरूंच्या २०० वाहनांचा ताफा काश्मीर खोऱ्याकडे रवाना झाला. तत्पूर्वी बेस कॅम्पचा परिसर बम बम भोले, हर हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. जम्मू बेस कॅम्प इथून आतापर्यंत आठ हजार ६३२ यात्रेकरू अमरनाथ यात्रेसाठी रवाना झाले आहेत. हेलिकॉप्टर सेवेद्वारे

पोहोचलेल्या तीन हजारहून अधिक यात्रेकरूंनी आज  पवित्र गुफेत शिवलिंगाचे दर्शन घेतले. प्रधानमत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अमरनाथ यात्रेकरूंना शुभेच्छा दिल्या आहेत. बाबा बर्फानी यांची पूजा आणि दर्शनाशी निगडीत ही यात्रा शिवभक्तांना उपार ऊर्जा प्रदान करते असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. ५२ दिवस चालणारी ही यात्रा १९ ऑगस्टला असणाऱ्या श्रावण पौर्णिमेला संपणार आहे.

<><><><>

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहोळ्याचं आज आळंदी इथून पंढरीच्या दिशेनं प्रस्थान होत आहे. या सोहोळ्यासाठी राज्यभरातून भाविकांची गर्दी वाढली आहे. पहाटेपासून माऊलींचे नित्योपचार आणि भाविकांच्या महापूजेसोबत वीणा मंडपातील कीर्तन सेवा झाल्यानंतर माउलींचा महानैवेद्य झाला आणि दुपारी भाविकांसाठीचं नियमित दर्शन बंद केलं गेलं. प्रस्थानासाठी माउलींच्या चलपादुका चांदीच्या पालखीत विराजमान झाल्यानंतर हा पालखी सोहोळा वीणा मंडपातून बाहेर पडून सर्वप्रथम मंदिर प्रदक्षिणा करेल आणि समाधी मंदिराशेजारील आजोळघरी म्हणजे जुन्या गांधी वाड्यात रात्रीच्या मुक्कामासाठी विसावेल.उद्या सकाळी हा पालखी सोहोळा पुण्याच्या दिशेनं मार्गस्थ होणार आहे.

<><><><>

देश आपत्ति व्यवस्थापनात सर्वोत्तम पद्धतीचा अवलंब करत आहे असं मत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केलं. हिमाचल प्रदेश मध्ये विजय या पर्वतारोहण मोहिमेच्या ध्वजारोहण समारंभात ते बोलत होते. राष्ट्रीय आपत्ति प्रतिसाद दलांनी शून्य जीवितहानीचं लक्ष ठेवलं पाहिजे असं ते म्हणाले. एनडीआरएफचा जवान प्रतिकूल परिस्थितीत नागरिकांचं मनोबल कित्येक पटींनी वाढवतो अशा शब्दात त्यांनी एनडीआरएफ च्या जवानांचं कौतुक केलं. या

जवानांनी ही मोहीम हिमाचल प्रदेशच्या २१ हजार ६२५ फुट उंचीच्या माऊंट मनिरंग ला सर करून पूर्ण केली.

<><><><><>

युग युगीन भारत संग्रहालय देशाचा आत्तापर्यंतचा प्रवास दाखवेल, असा विश्वास केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी व्यक्त केला आहे. नवी दिल्लीच्या भारत मंडपम इथं युग युगीन भारत वस्तुसंग्रहालय या विषयावरच्या भारत-फ्रान्स क्षमता विकास कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी ते बोलत होते. हे संग्रहालय म्हणजे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्वप्न आहे. देशाचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या संग्रहालयात दिसेल, असं प्रतिपादन शेखावत यांनी केलं. या संग्रहालयाचं स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत आणि त्या दृष्टीनं सगळे प्रयत्न केले जात आहेत, अशी ग्वाही त्यांनी दिली.

<><><><><>

कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्ली उच्च न्यायालयाने १२ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. केजरीवाल यांची केंद्रीय अन्वेषण संस्थेची तीन दिवसांची कोठडी आज संपल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला. केजरीवाल यांना २६ जूनला सीबीआय कोठडी सुनावण्यात आली होती.

<><><><><>

पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉक्टर सी.व्ही. आनंद बोस यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधात मानहानीची याचिका दाखल केली असल्याचं वृत्त काही माध्यमांनी दिलं आहे. मात्र याबाबत अद्याप कोणताही निर्णय झाला नसल्याचं राजभवनातल्या सूत्रांनी म्हटलं आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला, एका वार्ताहर परिषदेत बॅनर्जी यांनी, महिला कोलकाता राजभवनात जाण्यास घाबरतात, अशा आशयाचं विधान केलं होतं. त्या विरोधात मानहानीची याचिका दाखल करण्याचा

विचार राज्यपाल करत आहेत. राज्यपाल सध्या दिल्लीत असून ते कोलकाता इथं आल्यावर याबाबत निर्णय घेतला जाईल, असं राजभवनातल्या सूत्रांनी म्हटलं आहे. राजभवनातल्या एका महिला कर्मचारीनं २ मे रोजी राज्यपालांनी छेडछाड केल्याचा आरोप केला होता.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या रविवारी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेच्या तिसऱ्या आवृत्तीचा हा पहिला भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम प्रसारित होईल. समाजमाध्यमांवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

रांचीच्या पी एम एल ए न्यायालयानं झारखंडचे माजी मंत्री आलमगीर आलम यांना आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी २ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्याना १ जुलै रोजी दूरदृश्यप्रणाली द्वारे न्यायालयासमोर हजर करण्यात येईल.

**<><><><><>**

तीन नवीन फौजदारी कायदे 1 जुलै 2024 पासून देशभर लागू होणार आहेत. या कायद्यांची माहिती सर्वसामान्यांना व्हावी, यासाठी केंद्रीय विधी आणि न्याय मंत्रालयानं उद्या मुंबईतल्या वरळी इथल्या एनएससीआय सभागृह इथं " फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात भारताचा प्रगतीशील मार्ग" या विषयावर परिषदेचं आयोजन केलं आहे.

या परिषदेचे उद्घाटन राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या उपस्थितीत होणार आहे.

पोलीस, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील.

<><><><>

वेस्ट इंडिजमध्ये सुरु असलेला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज बार्बोडस इथं  भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम सामना सुरु आहे. या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. भारतानं गेल्या सात महिन्यांमध्येच दुसऱ्यांदा आयसीसी विश्वचषक स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे.

<><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघांमध्ये सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवसअखेर दक्षिण आफ्रिकेनं पहिल्या डावात ४ बाद २३६ धावा केल्या आहेत. दक्षिण आफ्रिका अजूनही ३६७ धावांनी पिछाडीवर आहे.

त्याआधी आज सकाळच्या पहिल्या सत्रातच भारतानं आपला पहिला डाव कालच्या ४ बाद ५२५ धावांवरून पुढे सुरु केल्यानंतर विक्रमी ६ बाद ६०३ धावांवर घोषित केला. ही महिला कसोटी क्रिकेटमधील आजवरची सर्वोच्च सांघिक धावसंख्या असून, भारत महिला कसोटी क्रिकेटमध्ये ६०० धावांचा टप्पा गाठणारा पहिला संघ ठरला आहे. हा विक्रम रचताना भारतानं ऑस्ट्रेलियाच्या ९ बाद ५७५ या आजवरच्या सर्वोच्च सांघिक धावसंख्येला मागे टाकलं.

<><><><>

ट्युनिशिया इथं सुरू असलेल्या जागतिक टेबल टेनिस स्पर्धेत भारताच्या दिया चितळे आणि यशस्विनी घोरपडे या जोडीनं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत या जोडीनं दक्षिण कोरियाच्या यू सिवू आणि किम सीओंगजीन या जोडीचा ११-४, ११-२, ११-२ असा पराभव केला.

//<><><><><>//